डेबोरा सॅम्पसन

युद्ध लढण्यासाठी गेली



ब्रायना स्टीवंस

मराठी: अश्विनी बर्वे

साल होते १७८१. अमेरिकी क्रांती जोरात होती. डेबोरा सॅम्पसनची अधिकांश पुरुषां इतकी उंची आणि जवळपास तेवढीच ताकद होती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढण्यासाठी न जाण्याचे कोणतेही कारण तिला दिसत नव्हते. शिवाय ती एक महिला आहे हे सत्य असले तरी त्याकडे ती बघत नव्हती.

ही एका महिलेची रोमांचक आणि खरी कहाणी आहे, जी सर्व अडचणी बाजूला सारून युद्धात भाग घ्यायला गेली. डेबोरा सॅम्पसनने स्वतःला एका मर्दाच्या रुपात प्रस्तुत केले आणि सेनेत सामील झाली आणि जखमा आणि आजारी पडून सुद्धा कोणालाही शेवटपर्यंत तिचे रहस्य समजले नाही.
हे कल्पनेपेक्षा अधिक रोमांचक सत्य आहे.




डेबोरा सैम्पसन

युद्ध लढण्यासाठी गेली

ब्रायना स्टीवंस

मराठी: अश्विनी बर्वे



१७६० मध्ये जॉर्ज वाशिंग्टनच्या
लग्नाला एक वर्षे पूर्ण झाले होते.



थॉमस जेफरसन आता कॉलेज सुरु
करत होते, ते १६ वर्षाचे होते.

बेंजामिन फ्रैंकलिन यूरोपच्या दौऱ्यावर होते.



मिसेज़ सैम्पसन यांना मुल होणार होते.



डेबोरा सैम्पसनचा जन्म १७ डिसेंबर, १७६०ला झाला.

आपल्या जीवनाच्या पहिल्या पाच वर्षांच्या काळात जॉर्ज वाशिंगटनला आपली पत्नी मार्थाला खुश करण्याची चिंता असे.



थॉमस जेफरसन यांना चांगले
मार्क्स मिळवण्याची काळजी होती.




बेंजामिन फ्रैंकलिन राजनीतीबाबत चिंतेत होते.



सैम्पसन परिवाराला पैशांची काळजी होती.
असे वाटत होते की त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते.





शेवटी, मिस्टर सैम्पसन यांनी नाविक होण्याचा निर्णय घेतला.

आपल्या परिवाराचे भरण पोषण करण्यासाठी पुरेसे धन कमवण्याच्या हेतूने ते समुद्रात एका जहाजावर गेले.

पण त्यांचे जहाज वादळात हरवले. मग त्यांच्या परिवाराला ते कधीच दिसले नाही. इतर कोणालाही ते कधी दिसले नाही.

१७६० मध्ये महिलांसाठी खूप कमी नोकऱ्या होत्या.

मिसेज़ सैम्पसन एकटी सहा मुलांची देखभाल करू शकत नव्हती.

तिने आपल्या काही मुलांना आपल्या इतर नातेवाईकांकडे राहण्यासाठी पाठवले.

डेबोरा आपल्या चुलत भावाकडे राहायला गेली, नंतर एका पाद्र्याच्या विधवे बरोबर

आणि जेव्हा ती १० वर्षांची झाली, तेव्हा डेबोरा, बेंजामिन थॉमस परिवारा बरोबर राहण्यास गेली.

ते एक सुदैवी पाऊल ठरले.


डेबोराला थॉमस परिवारात खूप कष्ट करावे लागले.


तिने शेत नांगरले आणि गायीचे दूध काढले.

ती जनावरांना खायला घाले आणि आपले कपडे स्वतःच धूत असे.

पण ती शाळेतही जात असे.

१७७० मध्ये खूपसाऱ्या मुली एवढ्या भाग्यवान नव्हत्या.





डेबोराला शाळा आवडत असे. तिला विशेष करून वाचायला शिकायला आवडत असे.

लवकरच ती ते सर्व वर्तमानपत्र वाचू लागली जे तिच्या हातात येत असत.

ती काय वाचत होती?


करांच्या बाबत.

त्याकाळी अमेरिका १३ वसाहती मिळून बनली होती.

तिला तोपर्यंत संयुक्त राज्य म्हटले जात नव्हते. या सर्व ब्रिटीशांच्या वसाहती होत्या.

ब्रिटनला पैशांची गरज होती, म्हणून त्यांनी नवीन कायदे करण्यास सुरुवात केली.

या कायद्यांनी वसाहतीतल्या लोकांना वर्तमानपत्र, चहा आणि रंग सारख्या वस्तूंवर कर देण्यास मजबूर केले. कराचा सर्व पैसा ब्रिटन घेऊन जात होता.



काही वसाहतीतल्या लोकांना हे बिलकुल योग्य वाटले नाही. त्यांचा पैसा ब्रिटनला का जाईल?


त्यांना स्वतःला एक नवीन जग उभे करायचे होते. त्यांना स्वतःला पैशांची गरज होती. ब्रिटनने त्यांना आता एकट्याला सोडायला हवं. ब्रिटनने त्यांना शासन करू द्यायला हवे. या नाराज लोकांना देशभक्त म्हटले जाई.

डेबोरा या लोकांशी सहमत होती .

१७७३ मध्ये डेबोराने बोस्टन टी पार्टीच्या बाबत वाचले. काही देशभक्त तीन ब्रिटिश जहाजांवर चढले.

आणि त्यांनी ब्रिटिश चहाच्या ३४० पेट्या समुद्रात फेकल्या. ते ब्रिटीश कराला विरोध करत होते.


डेबोराला वाटले की ते बरोबर करत आहे.



१७७५ मध्ये डेबोराने ताजी बातमी वाचली.

ब्रिटिश सैनिक आणि वसाहतीतील
लोकांमध्ये लढाई सुरु झाली.

अमेरिकी क्रांतीची सुरुवात झाली होती.



डेबोराला पण लढायचे होते. पण ती केवळ १४ वर्षाची होती. याशिवाय ती एक मुलगी होती.

केवळ मुलांना आणि पुरुषांनाच सेनेत सामील होण्याची अनुमती होती.

पण सात वर्षानंतर डेबोरा जेव्हा २१ वर्षाची झाली तेव्ही युद्ध चालूच होते.

डेबोरा आता एक उंच धिप्पाड तरुणी झाली होती. वास्तवात ती अनेक पुरुषांपेक्षा उंच होती. तिच्याकडे ताकद होती.

ती शेताचे नांगर ओढू शकत असे.

ती एक कुशल सुतार होती. तिने आपल्या हाताने एक गोदाम तयार केले होते. "जर मर्द स्वातंत्र्यासाठी लढू शकतात,तिने विचार केला, "तर मग मी का नाही?"



ती त्याबाबत जेवढा विचार करे, तेवढी लढण्याची इच्छा तिला होत असे.

मग एक दिवस डेबोराने एक पुरुषी पोशाख शिवला.



तिने आपले केस पुरुषांसारखे बांधले.



तिने आपल्या स्तनांना चारी बाजूनी करकचून कापडात बांधले त्यामुळे तिची छाती पुरुषांसारखी सपाट दिसेल.

तिने आपला नवीन पोशाख घातला.मग ती ३५ मैल पायी चालत बिलिंघम, मैसाचुसेट्सला गेली.

तिथे जाऊन ती सेनेत सामील झाली.



बिलिंघममध्ये कोणी डेबोराला ओळखत नव्हते. तिने आपले नाव रॉबर्ट शर्टलेफ सांगितले.

कोणाच्या लक्षात आले नाही की ती एक महिला आहे.


सगळ्यांनी विचार केला की ती एक तरुण पुरुष आहे.

काही अमेरिकी सैनिक केवळ १६ वर्षाचे होते

डेबोरा, न्यूयॉर्क शहराजवळ वेस्ट पॉइंट वर एका रेजिमेंटमध्ये सामील झाली.

दिवसा ती आपल्या रेजिमेंटच्या बरोबर मार्च करत असे.

संध्याकाळी सर्व सैनिक हडसन नदीत अंघोळ करत असत. पण डेबोरा नेहमी खूप रात्र झाल्यावर आंघोळ करत असे. ज्यामुळे कोणाला कळत नसे की ती एक महिला आहे.





न्यूयॉर्क शहराच्या जवळची लढाई कठीण होती.

लवकरच डेबोराच्या रेजिमेंटला कारवाईसाठी बोलावले गेले.


डेबोरा आणि इतर काही सैनिकांना इंग्रजांची गुप्तपणे माहिती काढण्यासाठी पाठवले गेले.

त्यांनी माहिती काढली की इंग्रजांनी आपला डेरा कुठे घातला आहे. मग त्यांनी त्याची सूचना दिली.

दुसऱ्या दिवशी अमेरिकनांनी हल्ला केला आणि ते जिंकले.

डेबोराचे पुढचे काम अजूनच धोकादायक होते. इंग्रज अमेरिकन शेतकऱ्यांच्या गायी चोरत होते. अमेरिकन गायी ब्रिटीश सेनेचे जेवण होते. डेबोरा च्या रेजिमेंटने ही चोरी रोखण्यासाठी सांगितले.





लढाईच्या वेळेस डेबोराच्या डोक्याला एक गोळी लागली. दोन मस्कट बॉल तिच्या पायाला लागले.

"मला दवाखान्यात घेऊन जाऊ नका," तिने विनंती केली.

“मला मरू द्या” पण सैनिकांनी तिचे म्हणणे ऐकण्यास नकार दिला. उलट एका सैनिकाने तिला घोड्यावर बसवले, आणि तो स्वतः तिला सहा मैल दूर असणाऱ्या एका दवाखान्यात घेऊन गेला..

डेबोरा वाईट प्रकारे जखमी झाली होती, पण ती वेदनेला जेवढी घाबरत होती त्यापेक्षा अधिक ती दवाखान्याला घाबरत होती. तिला विश्वास होता की दवाखान्यातल्या लोकांना समजेल की ती एक महिला आहे. एका डॉक्टरने तिच्या डोक्याला पट्टी बांधली. “अजून कुठे तुम्हांला लागले आहे काय?” त्याने विचारले.

“नाही” डेबोरा खोटे बोलली. डॉक्टर निघून गेले. तेव्हा त्याने डेबोराची पैंट एका खुर्चीवर पडलेली पहिली. त्याने पैंट उचलली.

डॉक्टरने पैंटवर मस्कट बॉल (गोली) मुळे पडलेल्या भोकामध्ये आपले बोट घातले.

“हे काय आहे?” त्याने विचारले.

"एका झाडाची फांदी पॅन्टमध्ये घुसल्याने पॅन्ट फाटली," डेबोरा परत खोटे बोलली.

डॉक्टरांनी तिच्यावर विश्वास ठेवला.




डेबोरा त्या रात्री झोपली नाही. जेव्हा सगळीकडे शांत झाले तेव्हा ती उठली आणि तिने एक लांब धातूचे उपकरण '"प्रोब" उचलले.

मस्कट बॉल (गोळी) काढण्यासाठी तेव्हा "प्रोब" चा उपयोग केला जाई.

तिला काही पट्ट्या पण मिळाल्या.


डेबोरा परत अंथरुणावर झोपली. तिने "प्रोब" आपल्या पायात घुसवले. तिने जखमेतून एक बंदुकीची गोळी बाहेर काढली. दुसरी गोळी तिच्या पायातच फसलेली राहिली. डेबोरा तिच्या पर्यंत पोहचू शकली नाही. ती गोळी खूप आत होती.



दवाखान्यात डेबोराला रोज काळजी वाटे की ती महिला आहे हे कोणाला कळेल का? ती एवढी काळजीत होती त्यामुळे तिने पूर्ण बरे होण्याच्या आतच दवाखाना सोडला. सुदैवाने तिचे पुढचे काम सोप्पे होते. ती जनरल पैटर्सनच्या घरी काम करायला गेली. मग काही महिन्यानंतर तिला फिलाडेल्फियाला पाठवले गेले. अमेरिकी सैनिकांना दर महिन्याला ६.६७ डॉलर वेतन मिळायला हवे होते. पण कॉंग्रेसकडे सैनिकांना देण्यासाठी पैसे नव्हते. अधिकतर सैनिका विना वेतन लढत होते. पण काहीजणांनी लढण्यास नकार दिला. त्याशिवाय त्यांनी स्टेट हाउसवर कब्जा केला.

कांग्रेसला प्रिंसटन, न्यू जर्सीला जावे लागले.

क्रोधित लोकांना शांत करण्यासाठी डेबोराला इतर १५०० सैनिकांबरोबर फिलाडेल्फियाला पाठवण्यात आले.





हिवाळा आला.


डेबोराचे बूट झिजले होते. पण सेना आपल्या सैनिकांना कपडे देत नसे. सैनिकांना स्वतःलाच आपला पोषाख खरेदी करावा लागे. डेबोराच्या जवळ नवीन बूट खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते. तिचे हुळहुळीत झालेले पाय बर्फावर लाल ठसे उमटवत असत. लवकरच ती आजारी पडली.

एकदा परत शिपाई तिला दवाखान्यात घेऊन गेले. यावेळी डेबोरा अनेक दिवस झोपून राहिली.

डॉक्टरांना वाटले की ती मेली आहे.

डेबोराला ऐकू येत होते की लोक तिचे दफन करण्याची योजना करत आहेत. पण अशक्तपणामुळे ती रडूही शकत नव्हती. जेव्हा एक नसे तिथून गेली तेव्हा तिने डेबोराच्या कण्हाचा आवाज ऐकला. ती नर्स मदत करण्यास धावली.

डॉ. बिन्नीने डेबोराची नस बघितली. पण त्यांना त्यात कोणतीच हालचाल जाणवली नाही. मग त्यांनी तिचे हृदय तपासण्यासाठी तिच्या शर्टात हात घातला. पण डेबोराची छाती चारी बाजूनी कपड्याने बांधलेली होते. त्यामुळे त्यांच्या हातात कापड आले. डॉ. बिन्नी यांनी ते कापड फाडले.



मग ते आश्चर्याने बघत राहिले. आता कोणतीही शंका नव्हती.

सैनिक शर्टलेफ एक महिला होती!

डॉ. बिन्नीने डेबोराचे महिला असण्याचे सत्य एक रहस्य म्हणून जपले.

पण त्यांना वाटले की सैनिकांच्या दवाखाना कोणत्याही महिलेसाठी चांगली जागा नाही.

म्हणून त्यांनी डेबोराला आपल्या परिवाराबरोबर राहण्यासाठी घरी नेले.

डेबोरा आताही आपला सैनिकाचा पोशाख घालत असे.

डॉ. बिन्नी यांच्या परिवाराला कधीही कळले नाही की ती एक महिला आहे.


जेव्हा ती बरी झाली तेव्हा डेबोरा आपल्या रेजिमेंटमध्ये परत गेली.

क्रांतिकारी युद्ध समाप्त होत होते.

१७८३ मध्ये डेबोराला, वेस्ट पॉइंटवर बोलावले गेले देशाला शांतता मिळाली होती. अमेरिकन जिंकले होते. आता डेबोराच्या रेजिमेंटची गरज नव्हती.

जेव्हा ती वेस्ट पॉइंटला पोहचली, तेव्हा, जनरल पैटरसनने डेबोराला बोलावले.

जनरल पैटरसनने आपल्या टेबलावर ठेवलेल्या पत्राकडे बघितले. ते पत्र डॉ. बिन्नीचे होते.





जनरल पैटर्सन हसले.

माझ्या सेनेत कोणी महिला असू शकत नाही, त्यांनी विचार केला.

जनरलने डेबोराला पण ते पत्र दाखवले. त्यांनी वाटले की डेबोरापण त्यावर हसेल. पण पत्र बघून डेबोराचा चेहरा लाल झाला.



जनरल पैटरसनने तिच्याकडे बघितले.

"प्राइवेट शर्टलेफ," ते म्हणाले, “मला विचारायचे आहे की तुम्ही एक महिला आहात का?”

“हो, सर,” डेबोराने उत्तर दिले. “मी एक महिला आहे. माझे खरे नाव डेबोरा सैम्पसन आहे."

नंतर काय झालं?

डेबोरा सैम्पसनला २३ ऑक्टोबर १७८३ला सेनेतून सम्मानपूर्वक सुट्टी दिली गेली. ती मैसाचुसेट्सला आली, जिथे ती शॉनमध्ये आपल्या काकाबरोबर राहू लागली. जवळच बेंजामिन गैनेट नावाचा एक तरुण राहत असी. दोघांचे प्रेम जमले आणि एप्रिल १७८४ मध्ये त्यांनी लग्न केले. त्यांना तीन मुले झाली. अर्ल, मैरी आणि पेशेंस. त्यांनी चवथे मुल सुज़ाना शेफर्डला दत्तक घेतले. सुज़ानाच्या आईचा बाळाला जन्म देतेवेळी मृत्यू झाला होता आणि तिचे वडील एकटे तिची देखभाल करू शकत नव्हते.

डेबोरा आणि बेंजामिन यांची शेती खूप चांगली चालली नाही. त्यांना पैशांची गरज होती म्हणून डेबोरा भाषण देऊन काही कमाई करत असे. ती आपला सैनिकांचा वेष घालुन भाषण द्यायला जात असे. डेबोरा सैम्पसन अमेरिकेतली व्याख्यान देणारी पहिली महिला होती. तिने युद्धातील क्रांतिकारी अनुभव लोकांना सांगितले.

डेबोराला मैसाचुसेट्स सीनेटकडून $९५ चा आर्मी बैक-पे मिळाला. कारण ती जखमी झाली होती म्हणून पॉल रेवरेने तिला महिन्याला ८ डॉलरची संघीय पेंशन पण दिली.

डेबोरा सैम्पसनचा मृत्यु १८२७ मध्ये झाला आणि शेरोन, मैसाचुसेट्समध्ये त्यांना दफन केले गेले. त्यांच्या कबरीवर लिहले गेले आहे, "डेबोरा सैम्पसन गैनेट. रॉबर्ट शर्टलेफ, महिला सैनिक, सर्व्हिस १७८१-१७८३"